सकाळ

# के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे आजपासून संयुक्त पुण्यतिथी सप्ताहानिमित्त व्याख्यानमाला

सकाळ वृत्तसेवा

पंचवटी, ता. १९ : पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर (कै.) काकूशेठ उदेशी व सहकारमहर्षी (कै.) माधवराव बोरस्ते यांच्या संयुक्त पुण्यसमरण सोहळ्यानिमित्ताने के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे सोमवार (ता. २०)पासून २६ जुलैपर्यंत दुपारी साडेतीनला ऑनलाइन व्याख्यानमाला होणार आहे. व्याख्यानमालेत विविध मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.







सोमवारी 'कोवीड-१९ ऑनलाइन एज्युकेशन व त्यानंतर' या विषयावर प्रा. मिलिंद मुरूगकर, तर मंगळवारी (ता. २१) 'निरोगी आयुष्य-दीर्घ आयुष्य' विषयावर पुण्याचे डॉ. रवींद्र के. सेथिया व प्रा. डॉ. किशोर सं. जैन मार्गदर्शन करतील. बुधवारी (ता. २२) मुख्य कार्यक्रमावेळी खासदार हेमंत गोडसे व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर मार्गदर्शन करतील. गुरुवारी (ता. २३) शिक्षणतज्ज्ञ सचिन जोशी व डॉ. भूषण कर्डिले 'स्कूल एज्यकेशन' या विषयावर मार्गदर्शन करतील. इरिगेशन व वॉटर मॅनेजमेंट या विषयावर शुक्रवारी (ता. २४) अशोक सोनवणे व डॉ. सुनील कुटे पाण्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. शनिवारी (ता. २५) रोड कनेक्टिव्हिटी विषयावर दिलीप पाटील व प्रा. प्रकाश कडवे मार्गदर्शन करतील.

पुण्यस्मरण सोहळ्याच्या शेवटच्या दिवशी कृषी व शिक्षण या विषयावर मुक्त विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे व संस्थेचे समन्वयक डॉ. विनायक सेवलीकर मार्गदर्शन करणार आहेत. वरील सर्व कार्यक्रम झूमवर ऑनलाइन प्रसारित केले जाणार असून, त्यासाठी आयडी ९३२९५६८९३१६, पासवर्ड : २०८२४२ असा आहे. दुपारी साडेतीनला होणाऱ्या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी आदींनी केले आहे.

Nashik, Main
20/07/2020 Page No. 5